# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर

## कंत्राटी तत्वावर पदभरतीकरीता जाहीरात

**सन २०२३-२४**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांतर्गत तसेच जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर करीता खालील तक्त्यांमध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी तत्वावर खालील रिक्त पदांसाठी थेट मुलाखती घेण्याकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | प्रोग्रामचे नांव | मंजुर पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | नियुक्तीचे ठिकाण | प्रवर्ग | शेक्षणिक पात्रता | वय मर्यादा | दरमहा एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | NPCDCS | Cardiologist | 1 | SDH Kamptee-1 | Open-1 | DM Cardiology | ४३ वर्ष मागास वर्गीय प्रवर्गास ाठी/ ३८ वर्ष खुला प्रवर्ग तथा एमबीबीएस,विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेतज्ञ यांची वयोमार्यादा ७० वर्ष | Rs. 1,25,000/- |
| २ | IPHS | Gynecologist (OBGY) | 5 | SDH Ramtek-1, RH Narkhed-1, RH Kalmeshwar-1, RH Katol-1, RH Umred-1 | SC-2, ST-2, VJ-A-1, NT-C-1, NT-D-1, SBC-1, OBC-7, EWS-2, Open-6 | MD/ MS Gyn / DGO / DNB | | Rs.75,000/- |
| ३ | IPHS | Radiologist | 4 | Daga Women Hospital, Nagpur-1, RH Katol-1, SDH Ramtek-1, SDH Kamptee-1 | | MD Radiology / DMRD | | Rs.75,000/- |
| ४ | IPHS/ICU/HDU | Anesthetics | 4 | Daga Women Hospital, Nagpur-1, SDH Ramtek-1, RH Narkhed-1, RH Katol (ICU/HDU)-1 | | MD Anesthesia / DA / DNB | | Rs.75,000/- |
| ५ | IPHS/ /SNCU | Pediatrician | 5 | RH Kalmeshwar-1, RH Narkhed-1, RH Umred-1, Daga Women Hospital, Nagpur (SNCU/DEIC)-2 | | MD Paed / DCH / DNB | | Rs. 75,000/- |
| ६ | IPHS | Orthopaedic | 1 | Trama Care Center RH Umred/RH Bhiwapur-1 | | MS Orthopaedic / Diploma in Orthopaedic | | Rs.75,000/- |
| ७ | Pallacative Care/ NPHCE | Physician | 2 | NCD Cell, Nagpur-1, SDH Kamptee-1 | | MD Medicine / DNB | | Rs.75,000/- |
| ८ | NMHP | Psychiatrist | 2 | Mental Hospital, Nagpur-2 | | MD Psychiatry / DPM / DNB | | Rs.75,000/- |
| ९ | ICU/HDU | Medical Officer (MBBS) | 4 | Daga Women Hospital, Nagpur-1, SDH Ramtek-1, RH Katol-1, RH Umred-1 | SC-2, ST-2, NT-B-1, NT-C-1, NT-D-1, SBC-1, OBC-6, EWS-2, Open-6 | MBBS Registered by MMC | | Rs.60,000/- |

| अ क्र | प्रोग्रामचे नांव | मंजुर पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | नियुक्तीचे ठिकाण | प्रवर्ग | शेक्षणिक पात्रता | वय मर्यादा | दरमहा एकत्रित मानधन रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | Suman L2 | Medical Officer (MBBS) | 3 | RH Parshioni-1,<br>RH Mouda-1,<br>RH Kuhi-1 | | MBBS Registered by MMC | एमबीबीएस,विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेतज्ञ यांची वयोमार्यादा ७० वर्ष | Rs.60,000/- |
| ११ | Suman L3 | Medical Officer (MBBS) | 10 | SDH Ramtek-2,<br>RH Umred-2,<br>RH Bhiwapur-1,<br>RH Narkhed-1,<br>RH Hingna-1,<br>RH Kalmeshwar-1,<br>RH Katol-1,<br>RH Deolapar-1 | | MBBS Registered by MMC | | Rs.60,000/- |
| १२ | SNCU | Medical Officer (MBBS) | 2 | Daga Women Hospital, Nagpur-2 | | MBBS Registered by MMC | | Rs.60,000/- |
| १३ | Blood Bank | Medical Officer (MBBS) | 2 | RH Narkhed-1,<br>RH Umred-1 | | MBBS Registered by MMC | | Rs.60,000/- |
| १४ | SVHCP | Medical Officer (MBBS) | 1 | GMC, Nagpur-1 | | MBBS Registered by MMC | | Rs.60,000/- |
| १५ | NUHM | Medical Officer (Full Time) | 2 | NUHM Kampthee-1,<br>NUHM Umred-1 | SC-1, Open-1 | MBBS Registered by MMC | | Rs.60,000/- |
| | | **Total-** | **48** | | | | | |

अटी व शर्ती –

सविस्तर जाहिरात अटी, शर्ती तथा अर्जासह **www.nagpurzp.com** वर उपलब्ध आहे. तसेच सदर जाहीरातीबाबत पात्र/अपात्र उमेदवारांची मेरीट लिस्ट व पदभरतीबाबत वारंवार प्रसिध्द होणाऱ्या सुचना हया सर्व कार्यालयाच्या **www.nagpurzp.com** या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल.

आवश्यक कागदपत्रे :- खालील कागपत्रांची मुळ प्रतीची छायांकिंत प्रत स्वसाक्षांकित करुन अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

१) पदवी /पदविका प्रमाणपत्रे २) गुणपत्रिका (सर्व) ३) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे ४) जातीचे प्रमाणपत्र ५) शाळा सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला ६) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्र ७) वैद्यकिय अधिकारी/सुपर स्पेशालिस्ट/स्पेशालिस्ट पदाकरीता रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट ८) पासपोर्ट आकाराचा फोटो ९) RTGS/ NEFT/IMPS/UPI/DD व्दारे अर्जशुल्काचा भरणा केल्याची पावती अथवा डिमांड ड्राफ. १०) क्र. १ ते ९ पर्यतचे सर्व दस्तऐवज क्रमवारी जोडावेत.

**प्रत्यक्ष मुलाखतीबाबत सुचना :- वरील तक्त्यात नमुद पदांकरीता प्रत्येक मंगळवार व गुरुवार या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यत प्रत्यक्ष मुलाखत घेतली जाईल याची नोंद घ्यावी.**

टिप:- १) उमेदवारास प्रत्यक्ष मुलाखतीच्या दिवशी उपलब्ध रिक्त जागेवर त्याच दिवशी पदस्थापना देण्यात येईल.

२) उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखतीस (Walk-in-interview) करीता येतांना आपले मुळ शैक्षणिक, उच्च शैक्षणिक अर्हतेबाबत व आवश्यक दस्तऐवज सोबत घेवून यावे.

**अटी व शर्ती**

१. वरील सर्व पदे हि **निव्वळ कंत्राटी स्वरुपाची** असुन त्यांचा कालावधी दि. ३१/०३/२०२४ पर्यत राहील. हा कालावधी वाढविला जाण्याची शक्यता आहे परंतू सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही.

२. सदर पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. म्हणून अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा, अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४. ज्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती राज्य शासनाच्या नियमित मंजूर रिक्त पदावर करण्यात आली आहे. अशा कर्मचाऱ्यांची सेवा सदर पद रिक्त असेंपर्यत सुरु राहील. नियमित पदे भरले गेल्यास सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा आपोआप तात्काळ संपुष्ठात येईल.

५. अभियान अंतर्गत विविध स्तरावर पदभरती करण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशात नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत असून ही नियुक्ती राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्प संपुष्ठात येईपर्यत या पैकी जे अगोदर घेडेल तो पर्यत करण्यात येत आहे.

६. जिल्हा/परिमंडळ स्तरावरुन नियुक्त करण्यात येणाऱ्या व त्यांचे नियुक्ती/पुनर्नियुक्ती अधिकार जिल्हा/परिमंडळस्तरावर देण्यात आलेले आहेत. अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांचे कामकाज असमाधानकारक असल्यास कारणे दाखवा नोटीस/ज्ञापण बजावण्यात येईल. संबंधितांनी विहित मुदतीत खुलासा सादर केल्या नंतर खुलासा असमाधानकारक असल्यास नैसर्गिक न्याय तत्वानुसार स्वतःचे बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल. तद्नंतर असमाधानकारक कामकाजाबाबत खात्री केल्यानंतरच सेवा समाप्तीचे आदेश काढण्यात येईल. सेवा समाप्ती आदेशात त्यांच्या वर लावण्यात आलेल्या दोषारोपाचे व ते दोषारोप सिध्द होत असल्याचा सविस्तर उल्लेख करण्यात येईल.

७. कर्मचाऱ्या संदर्भात आर्थिक अनियमितता अथवा अन्य गंभीर बाबी निदर्शनास आल्यास कारणे दाखवा नोटीस/ज्ञापण बजावण्यात येईल. कर्मचाऱ्याने विहित मुदतीत खुलासा सादर केल्यानंतर खुलासा असमाधानकारक असल्यास नैसर्गिक न्याय तत्वानुसार स्वतःचे बाजू मांडण्याची संधी देण्यात येईल. अंतमतः कर्मचारी दोषी असल्यास सेवा समाप्तीचा प्रस्ताव राज्य कार्यालयास सादर करण्यात येईल.

८. लहान कुटुंब अट ही दिनांक २३/०७/२०२० पासून लागू करण्यात येत असून, दिनांक २३/०७/२०२० पासून दोनपेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कंत्राटी पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

९. उपरोक्त सर्व पदासाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

१०. सदर रिक्त पदांच्या संख्येत, ठिकाण व मानधनात बदल होवू शकतो.

११. अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकांस प्राधान्य दिले जाईल.

१२. उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही राज्यस्तरावरुन प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार घेण्यात येत असल्यामुळे जाहीरातीमधील नमूद दिनांकास विहीत कालावधीत सोबत दिलेल्या अर्ज नमुन्यात मुळ शैक्षणिक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह या कार्यालयात अर्ज सादर करावा, त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.

१३. संबंधित पदाकरीता नोंदणी नंतर पात्र, अपात्र यादी प्रसिध्द दिनांकास कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासंबंधी आक्षेप असल्यास वरील नमूद प्रमाणे कार्यालयीन वेळेत घेवून निराकरण केले जाईल त्यानंतर प्राप्त आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

१४. अर्जदाराला सोईनुसार पदस्थापनेचे ठिकाण बदलवून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१५. उपरोक्त संबंधीत पदाकरीता तत्सम कॉन्सीलकडून रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. अन्यथा उमेदवारांस अपात्र ठरवल्या जाईल.

१६. एकापेक्षा जास्त ठिकाणी कार्यरत असल्यास उमेदवाराने अर्ज करण्यात येवू नये. निवड उपरांत तत्सम बाब कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास नियुक्ती तात्काळ रद् करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

१७. पदभरती प्रक्रियेस कार्यालयात उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१८. जाहीरातीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या पदांकरीता प्रत्यक्ष मुलाखत घेण्यात येईल. त्याकरीता खालीलप्रमाणे गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

A) Subject Knowledge (10)
B) "Research & Academic Knowledge (10)"
C) Leadership Quality (10)
D) Administrative Abilities (10)
E) Experience (10)
F) For Govt. Experience-2 marks for one year
G) For Private Experience-1 marks for one year

Total Experience-10 marks Maximum. ***एकूण गुण - ५०***

सदर पदाकरीता पात्र उमेदवारांची थेट मुलाखत घेवून निवड करण्यात येईल.

अ) प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी एकापेक्षा जास्त उमेदवार उपलस्थित असल्यास सर्व उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येईल.

ब) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवाराचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

क) ज्या पदाकरीता (**उदा. सुपर स्पेशालिस्ट, स्पेशालिस्ट, वैद्यकिय अधिकारी (MBBS), व वै.अ. (NUHM)** Skill Assessment Protocol नुसार कौशल्य चाचणी घेणे अनिवार्य करण्यात आली आहे. त्या पदांकरीता पात्र उमेदवारांची नियुक्ती आदेश देण्यापूर्वी कौशल्य चाचणी घेण्यात येईल.

१९. मा. सहाय्यक आयुक्त यांच्या बिंदुनामावलीप्रमाणे आरक्षणामध्ये बदल झाल्यास उमेदवारांना कोणतीही पुर्व सुचना न देता कमी करण्यात येईल.

२०. बिंदु नामावलीनुसार राखीव प्रवर्गास अनुसरुन पदभरती जाहिरात दिल्यानंतर पुढील प्रक्रियेव्दारे अपेक्षित राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदाच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेवून ११ महिने कालावधीसाठी प्रतिक्षा यादीतील निवड केलेल्या खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

२१. शासकिय सेवानिवृत्त अधिकारी यांचेकरीता वयोमर्यादा ६५ वर्ष असेल तसेच अनुभवास प्राधान्य असेल. वर्ग -३ व वर्ग-४ च्या पदावरुन निवृत्त झालेले कर्मचारी कंत्राटी पदावर अर्ज करण्यासाठी दि. १७/१२/२०१६ रोजीच्या शासननिर्णयाव्दारे अपात्र आहेत.

२२. सेवानिवृत्त उमेदवारांना मानधन शासननिर्णय क्र. संकिर्ण -२७१५/प्र.क्र./१००/१३ दि. १७/१२/२०१६ नुसार अदा करण्यात येईल. (गट क व गट ड वगळता)

२३. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा कोणत्याही प्रकारे फौजदारी प्रकरण नसावे.

२४. वैद्यकिय अधिकारी (एम.बी.बी.एस), विशेषज्ञ आणि अतिविशिष्ठ विशेषज्ञ यांना ७० वर्ष व इतर रुग्ण सेवेशी संबंधित पदांसाठी (उदा. परिचारीका, अधिपरिचारीका, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषध निर्माण अधिकारी) वयोमर्यादा ६५ वर्ष राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याकरीता ५ वर्ष वयोमर्यादा शिथील राहील.

२५. मागासर्वीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु. १००/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी रु. १५०/- चे बॅक ऑफ महाराष्ट्र बॅंकेचे जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर खाते क्र. 60403391534, IFSC Code – MAHB0001321 वर RTGS/NEFT/IMPS/UPI/DD व्दारे भरणा करुन पावती फार्म सोबत जोडावे किंवा कोणत्याही Nationalised बॅंकेचा डिमांड ड्राफट **जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर** यांचे नावाने जोडण्यात यावा.

२६. संपूर्ण निवडप्रकिया ही गुणवत्तेवर आधारीत पारदर्शी पध्दतीने घेण्यात येईल.

२७. भरती प्रक्रिया स्थगिती देणे/रद् करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा अध्यक्ष, निवड समिती, रा.आ.अ. नागपूर यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

| | |
|---|---|
| स्वा- | स्वा- |
| **सदस्य सचिव** | **अध्यक्ष** |
| **जि.ए.आ.व कु.क.सो.** | **जि.ए.आ.व कु.क.सो.** |
| **तथा** | **तथा** |
| **जिल्हा आरोग्य अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** |
| **जिल्हा परिषद, नागपूर** | **जिल्हा परिषद, नागपूर** |